# पुणे ते बेंगलोर फक्त साडेतीन तासात? गडकरी होतायत ट्रोल



| वर्ष - 6 | अंक - 64 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत

- पिंपरीत उत्पादन शुल्क विभागाची मोठी कारवाई; ६० लाखांचा दारुचा...
- भारतीय संघात निवड होण्यासाठी खेळा : संग्राम पाटील
- दिघीतील माजी सैनिक भवनाला आयुक्तांचा 'हिरवा कंदिल'

www.mahaenews.com | बुधवार, दिनांक 8 जून 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews



'मुळशी पॅटर्न'च्या माध्यमातून मला शेतकऱ्यांचे प्रश्न राष्ट्रीय स्तरावर मांडण्याची संधी आली होती, परंतु काही कारणांमुळे ती पूर्ण झाली नाही. हा चित्रपट जर प्रवीण तरडेने बनवला असता तर या चित्रपटाचे नाव आणि कथानक कधीच बदलले नसते. हिंदीमध्ये देखील मी चित्रपटाचे नाव 'मुळशी पॅटर्न' ठेवले असते. मी स्वत: मुळशी गावचा आहे. एकेकाळी शेतीवर जगणारं हे सधन गाव मी अनुभवलं. मी जगलो आणि त्या विषयावर मी काम केले आहे. त्यामुळे या चित्रपटात मी सलमान खानला कधीच घेतले नसते. कारण सलमान या भूमिकेसाठी कधी सूट झाला नसता,"

- **प्रवीण तरडे,** लेखक अभिनेता, दिग्दर्शक

"जेव्हा वेब न्यूज पोर्टलचे लोक दोन्ही बाजू दाखवत होते. तेव्हा उत्तर प्रदेशच्या सरकारने त्या लोकांवर गुन्हे दाखल केले की तुम्ही वातावरण खराब करण्यासाठी व्हिडिओ दाखवले. आता जर वेब न्यूज पोर्टलचं काम सत्य दाखवणं आहे, ते कोणचाही बाजू घेत नव्हते. उत्तर सरकारने त्यांच्यावर यासाठी गुन्हे दाखल केले कारण की, दोन्ही बाजूने दगडफेक झाली हे दाखवलं जाऊ नये. दोन्ही बाजूंनी दगडफेक झाली मात्र एका बाजूच्या लोकांची अटक होतेय, जे की नेहमीच होतं. त्यांची घरं तोडली जातील अशी धमकी दिली जाते."

- **असदुद्दीन ओवेसी,** एमआयएमचे अध्यक्ष खासदार



## शॉर्ट न्यूज »

### पिंपरीत उत्पादन शुल्क विभागाची मोठी कारवाई; ६० लाखांचा दारुचा साठा जप्त



**। पुणे ।**
पुणे विभागातील राज्य उत्पादन शुल्क विभागाने मोठी कारवाई करत तब्बल ६० लाखांची विदेशी दारू जप्त केली आहे. मुंबई-बंगळुरू महामार्गावर तळेगांव टोलनाका परिसरात सापळा रचून ही कारवाई करण्यात आली. ही विदेशी दारू गोवा राज्यात विक्रीसाठी नेली जात होती. याप्रकरणी पोलिसांनी दोघांना अटक केली आहे, तर विदेशी मद्याच्या एकूण १००६ पेट्या जप्त केल्या आहेत. याप्रकरणी वाहन चालक जयकिसन धीमाराम ढाका, सुजानाराम जियाराम बिष्णोई यांना अटक करण्यात आली आहे. त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हे दोघेही राजस्थान येथील रहिवाशी असल्याची माहिती आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाला गोवा राज्यात बेकायदा दारू विक्री करण्यासाठी दोन कंटेनर जाणार असल्याची गुप्त माहिती मिळाली होती. त्यानुसार ट्रक कंटेनर क्र. एम एच ४८ ए. वाय-९४३४ आणि एम एच ०४ जे. यु. ३५१५ यांना सोमाटने टोलनाका परिसरात पकडण्यात आले.

### बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाची रावेत येथे कारवाई

# प्रशासक राजवटीत "बुलडोझर" राज!

## एका दिवसात दीड लाख चौरस फुटाची अनधिकृत बांधकामे जमीनदोस्त

**। पिंपरी । महाईन्यूज । विशेष प्रतिनिधी।**

**पिंपरी**-चिंचवड महापालिकेच्या वतीने अनधिकृत बांधकामावर कडक कारवाई सुरु केली आहे. मंगळवारी (दि. ७) ब क्षेत्रीय कार्यालयांतर्गत बीआरटी रोड रावेत येथील अनधिकृत व्यावसायिक पत्राशेडवर महापालिकेच्या बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग व 'ब' क्षेत्रिय कार्यालय यांनी संयुक्तिक अनधिकृत बांधकामावर कारवाई केली. या मध्ये ४४ पत्राशेड, ४ विट बांधकाम, पत्रा असे एकुण १ लाख ३१ हजार ९५० चौरस फुट अनाधिकृत बांधकामे निष्कासित केली.





➡ ही कारवाई अतिरिक्त आयुक्त ( २) जितेंद्र वाघ, शहर अभियंता मकरद निकम यांच्या मार्गदर्शनाखाली बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग संजय घुबे कार्यकारी अभियंता यांच्या नियंत्रणाखाली करण्यात आली.

➡ क्षेत्रीय अधिकारी अभिजित हराळे, उप अभियंता दिपक करपे, उपअभियंता राजेंद्र डुंबरे, प्रविण धुमाळ, रमेश जिंतीकर कनिष्ठ अभियंता, अ व ब प्रभाग येथील धड़क कारवाई पथकातील स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक-८, मनपा कर्मचारी व अतिक्रमण विभाग कर्मचारी तसेच ०६ मनपा पोलिस कर्मचारी व रावेत पोलिस स्टेशन ०५ पोलीस उपनिरीक्षक, २१ पोलिस कॉन्स्टेबल कर्मचारी, महाराष्ट्र पोलिस सुरक्षाबल ५४ कर्मचारी यांच्या सहाय्याने करण्यात आली. सदर कारवाई जेसीबी तसेच १४ मजुर यांच्या मार्फत कारवाई करणेत आली.

## शॉर्ट न्यूज »

### थंडपेयातून गुंगीकारक पदार्थ देऊन बाणेरमध्ये महिलेवर अत्याचार



पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी

पिंपरी, ता. ७ : थंडपेयातून गुंगीकारक पदार्थ देऊन महिलेवर अत्याचार केला. तुला व तुझ्या पोराला जिवंत सोडणार नाही, तुझी सुपारी देतो, अशी धमकी दिल्याप्रकरणी हिंजवडी पोलिसांनी एकाला अटक केली आहे. हा प्रकार बाणेर येथे घडला. या पकरणी पीडित महिलेने फिर्याद दिली आहे. त्यानुसार परीक्षित सुभाष पाटील(वय ४३ रा, राजयोग सोसायटी, धानोरी) याला पोलिसांनी अटक केली आहे. तर अन्य एका गुन्हा दाखल आहे. फिर्यादी व आरोपी हे दोघे सिक्युरिटी एजन्सी चालवतात. यातून त्यांची ओळख झाली. आरोपीने फिर्यादीला कामाचे काही तरी बोलायचे आहे, असे सांगून हॉटेलवर नेले. जेवण झाल्यावर काही तरी अर्जंट काम आहे असे सांगून पुन्हा येतो तुम्ही लॉजमध्ये आराम असे सांगितले. पुन्हा एक तासाने येऊन फिर्यादीला थंड पेय घेऊन आला. त्यामधून गुंगीकारक पदार्थ देऊन फिर्यादीवर

### जाहीर नागरी सत्कार सोहळ्यास उत्स्फूर्त प्रतिसाद

# भारतीय संघात निवड होण्यासाठी खेळा : संग्राम पाटील



। पिंपरी । महाईन्यूज । विशेष प्रतिनिधी।

येलमार समाजातील तरुण कष्टाळू, होतकरु आहेत. ध्येयवादी असणारे तरुण अभ्यासात चिकाटी धरतात. याचमुळे 'एमपीएससी' असो की क्रीडा क्षेत्र असो याच स्वतःची चमक दाखवतात. यापुढे समाजातील तरुणांनी 'आयएएस, आयपीएस' होण्यासाठी 'युपीएसी टॉपर'साठी प्रयत्न करावेत. त्यासाठी आम्ही सर्व मदत करण्यास तयार असल्याचे मत येलमार समाज प्रतिष्ठाणचे अध्यक्ष संग्राम पाटील यांनी हिंजवडी येथे व्यक्त केले.

येलमार समाज प्रतिष्ठाणच्या वतीने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेत चांगले यश मिळवणाऱ्या तरुणांचा आणि क्रीडा क्षेत्रात भरीव कामगिरी करणाऱ्यांचा जाहिर नागरी सत्कार सोहळ्याचे आयोजन केले होते. आहे. त्यावेळी संग्राम पाटील बोलत होते. यावेळी व्यासपीठावर तिरुपती ग्रुपचे डायरेक्टर सुरेश पाटील, अमेरिकेत असणाऱ्या कन्सल्टंट कंपनीने डायरेक्टर रमेश लोकरे, सीमा लोकरे, कंडरेज ग्रुपचे डायरेक्टर अजित कंडरे, तेजस पाईपच्या मालक माडगूळकर, उद्योजक आणि ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते रंगनाथ येलमार, बलभीम कोळवले उपस्थित होते.

प्रतिष्ठाणच्या वतीने एमपीएसीद्वारे उपशिक्षणाधिकारी म्हणून निवड झालेले मयूर हणमंत लाडे, नायब तहशीलदार पदी निवड झालेले अमोल प्रकाश येलमार, राज्यात द्वितीय क्रमांकाने पोलीस उपनिरीक्षकपदी निवड झालेले गणेश शंकर येलमार, जलसंपदा विभागात सहाय्यक अभियंता म्हणून निवड झालेले तेजस ईश्वर लाडे, सार्वजनिक बांधकाम विभागात सहाय्यक अभियंता म्हणून निवड झालेले राहुल शंकर कोळवले तसेच देशपातळीवर झालेल्या थाळी/गोळा फेक स्पर्धेत कांस्यपदक मिळवणारी अंकिता उलभगत आणि व्हॉलीबॉल स्पर्धेतील प्रज्वल येलपले यांना सन्मानित करण्यात आले.

यावेळी सन्मानमूर्ती तरुणांनी अभ्यासाचे योग्य नियोजन, शारीरिक तंदुरुस्त आणि योग्य मार्गदर्शन घेतल्यास यश मिळते हे सांगितले. येणाऱ्या काळात खातेनिहाय आणखी परीक्षा देऊन पुढील पदासाठी नक्कीच प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.

> या कार्यक्रमास निवृत्त सहायक पोलिस आयुक्त जी.एस. माडगूळकर, प्रा. पंकज येलपले, प्रवीण लाडे, अशोक येलमार, सुभाष येलमार, नामदेव येलमार, श्रीधर येलमार, उत्तम येलमार, दिलीप येलपले, भाऊसाहेब कोळवले, डॉ. विकास पाटील, सौरभ उलभगत, ॲड. श्रीधर येलमार, सुहास गुराडे, राजेश लोकरे, बाळासाहेब येलपले, महेश येलमार आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अशोक येलमार, प्रास्ताविक राजेंद्र कंडरे आणि आभार भाऊसाहेब कंडरे यांनी मानले.

# दिघीतील माजी सैनिक भवनाला आयुक्तांचा 'हिरवा कंदिल'

### आमदार महेश लांडगे, चेतन घुले यांचा पाठपुरावा / माजी सैनिक विकास संघाच्या मागणीला अखेर यश

पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी



पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाच्या वतीने दिघी येथे विकसित केलेल्या बहुउद्देशीय इमारतीतील दोन मजले माजी सैनिक भवनसाठी देण्यात आले. त्याची कागदोपत्री पूतर्ता करण्यात येणार आहे. याबाबत महापालिका आयुक्त व प्रशासक राजेश पाटील यांनी सकारात्मक भूमिका घेत कार्यवाही करु, असे आश्वासन दिले आहे.

भाजपा शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे यांनी महापालिका भवनात आयुक्त राजेश पाटील यांची भेट घेतली. यावेळी माजी सभपती चेतन घुले, माजी सैनिक विकास संघाचे अध्यक्ष नरेंद्रसिंह चौहान, आमसिद्ध भिसे, उमेशसिंग पनवर, वासुदेव पाटील, वामन वाडेकर, तानाजी गुजर आदी माजी सैनिक उपस्थित होते.

माजी सभापती चेतन घुले म्हणाले की, पिंपरी-चिंचवड महापालिका बहुद्देशीय इमारत ही आमदार महेश लांडगे स्थायी समिती अध्यक्ष असताना मंजूर केली होती. त्यानंतर ही इमारत तयार झाल्यानंतर त्यातील दोन मजले माजी सैनिक संघाच्या कामकाजासाठी देण्याबाबत निर्णय झाला. तत्कालीन नगरसेवकांनी संबंधित दोन मजले माजी सैनिक विकास संघाच्या नावे करण्याबाबत कागदोपत्री पाठपुरावा केला. मात्र, प्रशासनाकडून दिरंगाई होत होती.

दरम्यान, यासंदर्भात महापालिका आयुक्त राजेश पाटील यांच्यासोबत आमदार लांडगे यांच्या उपस्थितीमध्ये बैठक घेण्यात आली. आयुक्तांनी संबंधित दोन मजले माजी सैनिक विकास संघाकरिता देण्यासाठीची कार्यवाही करण्याबाबत आश्वासन दिले आहे. त्यामुळे लवकरच हा प्रश्न मार्गी लागणार आहे.

## संपादकीय »

### नमो नमः वसुंधरा !

***यंदा पर्यावरण दिनासाठी 'एकमेव पृथ्वी' ही संकल्पना ठेवण्यात आली होती. अशा प्रकारचे दिन साजरे करण्याला हल्ली एका मोठ्या इव्हेंटचे स्वरूप आले असून, भव्यदिव्य समारंभांत मूळ हेतू हरविण्याचा धोका असतो. पर्यावरण दिनाच्या बाबतीतही तसेच होत असल्याचा अनुभव आहे. मुळात असे दिन 'साजरे' करायचे नसतात, तर ते 'आचरणात' आणायचे असतात.***

वसुंधरेला वाचविण्याची कधी नव्हती इतकी गरज आज भासते आहे. म्हणूनच यंदा पर्यावरण दिनासाठी 'एकमेव पृथ्वी' ही संकल्पना ठेवण्यात आली होती. अशा प्रकारचे दिन साजरे करण्याला हल्ली एका मोठ्या इव्हेंटचे स्वरूप आले असून, भव्यदिव्य समारंभांत मूळ हेतू हरविण्याचा धोका असतो. पर्यावरण दिनाच्या बाबतीतही तसेच होत असल्याचा अनुभव आहे. मुळात असे दिन 'साजरे' करायचे नसतात, तर ते 'आचरणात' आणायचे असतात. पृथ्वीचे तापणे, कार्बन उत्सर्जन, हवामान बदल आदींनी मला काय फरक पडतो, असे वाटणाऱ्यांची संख्या मोठी असून, त्यामुळे पर्यावरणाचे प्रश्न बहुतेकांना आपले वाटत नाहीत. परिणामी ते त्यांची जीवनशैली कायम ठेवतात. पर्यावरण दिनाची संकल्पना ५० वर्षांपासून राबविण्यात येत असूनही पुरेशी जनजागृती झाली नाही, असा याचा अर्थ होतो. वास्तविक, पर्यावरणाचे प्रश्न आपल्याशी थेट संबंधित आहेत. तीन दशकांपूर्वीपर्यंत आल्हाददायक हवेसाठी प्रसिद्ध असलेल्या पुण्यात यंदाच्या उन्हाळ्यात पारा ४२-४३ अंश सेल्सिअसपर्यंत गेला होता. वाढत्या काँक्रिटीकरणामुळे अवघे पुणे महानगरच उष्णतेचे बेट झाल्याचा अहवाल आहे. याच पुण्यात अडीच वर्षांपूर्वी ओढ्याला पूर येऊन निम्मे शहर पाण्याखाली गेले होते. गेल्या काही वर्षांत कोकण किनारपट्टीवर चक्रीवादळे थडकण्याचे प्रमाण वाढले असून, सलग दोन वर्षे कोकणावर निसर्गाची अवकृपा झाली आहे. सांगली-कोल्हापूर भागांत महापुराचे प्रमाण वाढले आहे. मराठवाडा-विदर्भ या टापूला भाजून काढणारा उन्हाळा नवा नसला, तरी गेल्या काही वर्षांत तिथे कमाल तापमानाने ४७-४८ अंश सेल्सिअसचा टप्पा गाठला आहे. विहिरी आटण्याचे, नद्या कोरड्या पडण्याचे आणि जमिनीच्या खाली खोलवर गेल्यावरही पाणी न लागण्याचे प्रमाण वाढले आहे.

## आनंदी सकाळ

### जय जय रघुवीर समर्थ

महाराष्ट्रात वारकरी संप्रदायाबरोबर रामदासी संप्रदायही तितकाच महत्त्वपूर्ण आहे. समर्थांनी दोन तपांहून अधिक काळ भारतभ्रमण केले. त्या काळातील हलाखीचे जीवन त्यांनी खूप जवळून पाहिले. देशाला विपन्नावस्थेतून बाहेर काढण्यासाठी त्यांनी आपले कार्यक्षेत्र महाराष्ट्रातील कृष्णेचे खोरे निवडले. समर्थांची अधिष्ठात्री देवता कोदंडधारी प्रभू रामचंद्र आणि दैववादाला थारा न देणारा प्रयत्नवाद हे सूत्र. म्हणूनच ते 'यत्न तो देव जाणावा' असे म्हणतात. समुदाय संघटन, नि:स्पृह महंत आणि भारतभरात मारुती मंदिरांची स्थापना, अशी त्यांच्या कार्याची दिशा होती.

समर्थ रामदासस्वामी शक्तीबरोबर युक्ती, विचाराबरोबर विवेक यांचा साक्षेपी अवलंब करणारे होते. त्यांची रामोपासना आक्रमक वाटावी अशी होती. त्यांच्या धर्मकारणाचे सूत्र 'पहिले हरिकथा निरुपण। दुसरे ते राजकारण। तिसरे ते सावधपण। सर्वविषयी।। चवथा अत्यंत साक्षेप। फेडावे नाना आपेक्ष।' असे होते. रामाच्या चरित्राधिष्ठानावरच धर्माला अनुकूल असणारे राजकारण सावधपणे करावे. तेथे 'उद्धटासी उद्धट। खटनटासी खटनट।' जोडून द्यावा. समर्थांच्या मते, आक्रमक पवित्र्याचे देश व समाजकार्य करावे, असे होते.

# पुन्हा टांगती तलवार !



भूमिका



गेल्या पंधरवड्यात महाराष्ट्रामध्ये करोनाच्या संख्येमध्ये पुन्हा एकदा वाढ दिसून आली असून, पुढील काही दिवसांत हा आलेख आणखी वर जाऊ शकतो, असा इशारा देण्यात आला आहे. गेल्या पंधरवड्यात महाराष्ट्रामध्ये करोनाच्या संख्येमध्ये पुन्हा एकदा वाढ दिसून आली असून, पुढील काही दिवसांत हा आलेख आणखी वर जाऊ शकतो, असा इशारा देण्यात आला आहे. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी गुरुवारी राज्याच्या 'टास्क फोर्स'ची बैठक घेतली. गेल्या १७ दिवसांत राज्यामध्ये प्रथमच करोनाबाधेमुळे एक मृत्यू ओढवला. करोना रुग्णांची संख्या दीड महिन्यांत सात पटींनी वाढली आहे. राज्यातील उपचाराधीन करोनाबाधितांची संख्या साडेचार हजारांच्या वर गेली आहे. करोनाच्या दोन वर्षांच्या काळात महापालिका स्तरावर अत्यंत कमी काळात जम्बो रुग्णालये उभी राहिली. आज या व्यवस्था बंद झाल्या आहेत. काही महापालिकांनी करोनासाठी घेतलेल्या आरोग्य कर्मचाऱ्यांची कंत्राटेही रद्द केली आहेत. सध्याच्या करोनाप्रकारात रुग्णालयांची गरज कमी लागते आहे; मात्र त्याबाबत गाफील राहून चालणार नाही. अनेक समस्या असूनही, देशभरात दोन टप्प्यांमधले लसीकरण पूर्ण झाले आहे. करोनाला उतार पडल्यामुळे लसीचा किंवा बूस्टर डोसचा आग्रह लोकांकडूनही कमी झाला. त्याच कारणामुळे लहान मुलांच्या लसीकरण मोहिमांनाही तितका प्रतिसाद मिळाला नाही. आता सर्व स्तरांवर व्यवहारचक्र पूर्णरूपाने व प्रत्यक्ष सहभागाने सुरू झाले आहे. ते तसे सुरू ठेवणे हेच या टप्प्यावरचे मोठे आव्हान आहे. शाळा-महाविद्यालये व परीक्षा प्रत्यक्षरूपात होऊ लागल्या असून, मुंबईच्या लोकलट्रेनही दुथडी भरून वाहत आहेत. पावसाळा तोंडावर असल्याने, नैसर्गिक आपत्तींना तोंड देण्याची तयारी सुरू आहे. आपण करोनाकाळात गिरवलेले धडे पुन्हा आठवण्याची गरज आहे. स्वच्छता आणि शुद्ध हवा यांबाबत आपण गेली अनेक वर्षे हेळसांड केली. करोनाकाळात सर्वच व्यवहार बंद असल्याने, किमान मूलभूत स्वच्छता पाळणे शक्य होत होते. आता पुन्हा सर्व व्यवहार सुरू ठेवून आपण आरोग्याचे धडे अंगात कसे भिनवतो, हे महत्त्वाचे ठरेल.

# काँग्रेसचा पक्षसंघटनेच्या पुनरुज्जीवनाचा नवसंकल्प

**खरे तर काँग्रेसमध्ये या दोन्ही गुणांचा आता लवलेशही राहिलेला नाही. पक्ष अनेकार्थाने रसातळाला चालला असताना, नेतृत्वाच्या पातळीवर चाललेली सबुरी पक्षाच्या दृष्टीने आता ओझे बनली आहे. हे ओझे एक तर उतरवा किंवा त्याची दिशा तरी बदला एवढे स्पष्टपणे सांगण्याचीही हिंमतही तेथे कोणी दाखविली नाही**

अखिल मानवजातीला श्रद्धा व सबुरीचा संदेश देणाऱ्या साईबाबांच्या शिर्डीत काँग्रेसने पक्षसंघटनेच्या पुनरुज्जीवनाचा नवसंकल्प सोडला. गांधी घराण्यावरील श्रद्धेवर चालणाऱ्या या पक्षातील ज्येष्ठांनी ही श्रद्धास्थानेही बदलण्याची गरज पक्षाच्याच व्यासपीठावर वारंवार व्यक्त केली असताना, अशांनाच सबुरीचा सल्लाही अप्रत्यक्ष दिला गेला. खरे तर काँग्रेसमध्ये या दोन्ही गुणांचा आता लवलेशही राहिलेला नाही. पक्ष अनेकार्थाने रसातळाला चालला असताना, नेतृत्वाच्या पातळीवर चाललेली सबुरी पक्षाच्या दृष्टीने आता ओझे बनली आहे. हे ओझे एक तर उतरवा किंवा त्याची दिशा तरी बदला एवढे स्पष्टपणे सांगण्याचीही हिंमतही तेथे कोणी दाखविली नाही. याउलट ज्यांनी पक्ष औषधाला का होईना पण जिवंत ठेवला, अशा अनेकांना 'एक व्यक्ती एक पद' या गोंडस नावाखाली राजीनामे द्यायला



भाग पाडले गेले. पन्नास वर्षांखालील पदाधिकाऱ्यांची संख्या कार्यकारिणीत निम्मी असावी; तसेच पाच वर्षांहून अधिक काळ कोणीही एका पदावर राहू नये यासारख्या उदयपूर घोषणापत्राच्या तरतुदींचा उद्देश चांगला असला तरीदेखील हे असले नियम लावले तर अनेक ठिकाणी बहुसंख्य पदे रिक्त राहतील. पक्षात सध्याच ज्येष्ठांचा सर्वाधिक भरणा आहे. तरुणांना सामावून घेण्याची कल्पना निश्चितच उजवी; पण त्यांना आकर्षित करण्यासाठी पक्षाकडे काय कार्यक्रम आहे, याचे सूतोवाच शिर्डीत दुर्दैवाने झाले नाही. उदयपूर घोषणापत्राच्या अंमलबजावणीच्या दिशेने एक पाऊल पुढे आणि पदाधिकाऱ्यांच्या राजीनाम्यांनी दोन पावले मागे असे वर्णन या शिबिराचे केले, तर ते अनाठायी ठरू नये. राज्यसभेच्या द्वैवार्षिक निवडणुकीसाठी उत्तर प्रदेशातील कोणा प्रतापगढी नामक सामान्य कव्वालला उमेदवारी दिल्याने पक्षात निर्माण झालेल्या असंतोषाच्या पार्श्वभूमीवर होत असलेल्या या शिबिरावर त्याची काजळछाया पसरणार होतीच. झालेही तसेच. सर्वच प्रमुख नेत्यांनी हायकमांडचा हा निर्णय कसा शिरसावंद्य आहे, मीडियातच कसे चुकीचे वर्णन येत आहे, अशी अपेक्षित भूमिका घेतली. प्रदेशाध्यक्ष पटोलेंनी आपला अजेंडा पुढे रेटला, तर थोरातांनी शक्तिप्रदर्शन करून आपले स्थान अधिक भक्कम केले. अशोक चव्हाणांसह अनेकांनी तर साईंच्या दर्शनातच समाधान मानले.

## ।। अभंगवाणी ।।



शिकविलें तुम्हीं तें राहे तोंवरी । मज आणि हरी वियोग तों ॥१॥
प्रसंगीं या नाहीं देहाची भावना । तेथें या वचना कोण मानी ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# भीती न बाळगता सेनेच्या उमेदवारांना निवडून आणा!

## मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचे आमदारांना आवाहन

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

राज्यसभेच्या सहाव्या जागेसाठी शिवसेना व भाजपमध्ये आमदारांना आपल्याकडे वळवण्यासाठी जोरदार रस्सीखेच सुरू झाल्याची संधी साधत अपक्ष व सहयोगी आमदारांनी नाराजी सूर लावल्याच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी शिवसेना व सहयोगी आमदारांची बैठक घेत कशाचीही भीती न बाळगता शिवसेनेच्या दोन्ही उमेदवारांना निवडून आणण्यासाठी मतदान करण्याचे आवाहन केले.

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सोमवारी सायंकाळी वर्षा या सरकारी निवासस्थानी शिवसेनेच्या व सहयोगी आमदारांशी संवाद साधला. महाविकास आघाडी सरकारमधील मंत्र्यांवर टक्केवारीचा आरोप करत घरचा अहेर देणारे शिवसेनेचे माजी व आता अपक्ष आमदार आशीष जैस्वाल यांच्यासह इतर अपक्ष आमदारही बैठकीला उपस्थित होते.



"बॅग भरून जेलमध्ये जायला ही काय सहल नाही"; अनिल परब यांचा सोमय्यांवर हल्लाबोल

राज्यसभा निवडणुकीवेळी मतदान करताना कशाचीही व कोणाचीही भीती बाळगू नका. पक्षाने एका निष्ठांवत शिवसैनिकाला राज्यसभेच्या उमेदवारीची संधी दिली आहे. कट्टर शिवसैनिक, पक्षाशी निष्ठावंत असलेल्या व्यक्तीलाही राजकारणात चांगली संधी मिळू शकते हा संदेश सामान्य माणसाला मिळावा व त्यांचा राजकारणावर विश्वास राहावा यासाठी संजय पवार यांचा विजय आवश्यक आहे, असे उद्धव ठाकरे म्हणाल्याचे समजते.

सहयोगी व अपक्ष आमदारांनी नाराजीचा सूर लावल्याने शिवसेनेसाठी दुसरी जागा निवडून आणण्याचे आव्हान आहे. त्यामुळे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे हे यात लक्ष घालत आहेत. आता महाविकास आघाडीच्या काँग्रेस व राष्ट्रवादीच्या आमदारांशीही मुख्यमंत्री ठाकरे संवाद साधणार आहेत.

### मतदानास परवानगीसाठी मलिक, देशमुख यांचा अर्ज

▶▶ राज्यसभेच्या १० जून रोजी होणाऱ्या निवडणुकीत मतदान करण्यासाठी एक दिवसाचा जामीन देण्याची विनंती आर्थिक गैरव्यवहाराच्या आरोपाप्रकरणी सध्या अटकेत असलेले राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते नवाब मलिक यांनी सोमवारी विशेष न्यायालयाकडे केली. माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनीही गेल्या आठवड्यात याच विनंतीसाठी विशेष न्यायालयात अर्ज केला होता. विशेष न्यायालयाने दोघांच्या अर्जावर उत्तर दाखल करण्याचे आदेश अंमलबजावणी संचालनालयाला (ईडी) देऊन अर्जावरील सुनावणी बुधवारी ठेवली आहे.

### सुप्रिया सुळे-जोरगेवार भेट

▶▶ चंद्रपूर : राष्ट्रवादीच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी सोमवारी चंद्रपूरचे अपक्ष आमदार किशोर जोरगेवार यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली. जोरगेवार यांनी राज्यसभा निवडणुकीच्या निमित्ताने वापरल्या जात असलेल्या 'घोडेबाजार' या शब्दावर आक्षेप घेतला होता. अपक्ष आमदारांवर संशय घेतल्यास वेगळा विचार करावा लागेल, असा इशाराही दिला होता. या पार्श्वभूमीवर सुळे-जोरगेवार भेटीला महत्त्व प्राप्त झाले आहे.

### तर शेवटच्या पाच मिनिटांत मतदान करू – बच्चू कडू

▶▶ नागपूर/अमरावती : राज्य सरकारला पाठिंबा देणारे छोटे पक्ष व समर्थित आमदारांकडून राज्यसभा निवडणुकीच्या तोंडावर महाविकास आघाडीची कोंडी केली जात असल्याचे चित्र विदर्भात आहे. धान, हरभरा खरेदीवर पंतप्रधानांशी चर्चा करून तोडगा न काढल्यास राज्यसभेच्या निवडणुकीत अखेरच्या पाच मिनिटांमध्ये निर्णय घेऊ, असा इशारा राज्यमंत्री बच्चू कडू यांनी दिला आहे. तर विकास निधीवाटप करताना मंत्री टक्केवारीची अपेक्षा करतात, त्यामुळे अपक्ष आमदारांमध्ये नाराजी आहे, असा आरोप सेनेला पाठिंबा देणारे रामटेकचे अपक्ष आमदार आशीष जयस्वाल यांनी केला आहे.

### आमदारांची मालाडमधील हॉटेलात सोय

▶▶ मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या बैठकीनंतर शिवसेनेच्या व सहयोगी आमदारांना दोन बसमधून मालाड येथील एका आलिशान रिसॉर्टवर नेण्यात आले. आता मतदानापर्यंत सर्व आमदार एकत्र राहतील. आधी या आमदारांना मरिन ड्राइव्हवरील पंचतारांकित हॉटेलमध्ये ठेवण्याचे नियोजन होते. नंतर स्थळ बदलून मालाडमधील रिसॉर्टवर नेण्याचा निर्णय झाला.

## शॉर्ट न्यूज »

### RSS ची कार्यालये बॉम्बने उडवून देण्याची धमकी



। मुंबई । महाईन्यूज ।

उत्तर प्रदेशमधील लखनऊ आणि उन्नावमधील नवाबगंज येथील राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (RSS) चे कार्यालय बॉम्बने उडवण्याची धमकी देण्यात आली आहे. या प्रकरणी लखनऊमध्ये एफआयआर दाखल करण्यात आली आहे. तक्रारीनंतर पोलीस धमकी देणाऱ्या व्यक्तीचा शोध घेत आहे. या धमकीनंतर सगळीकडे एकच खळबळ उडाली आहे. अलीगंज येथे राहणाऱ्या डॉ. नीळकंठ मणी पुजारींना एका विदेशी नंबरवरून 'व्हॉट्सॲप'वर हा धमकीचा मेसेज आला आहे. त्यात लखनऊसमवेत इतर सहा आरएसएसच्या कार्यालयांना बॉम्बने उडवून देण्याची धमकी देण्यात आली होती.

## ...मग पोलीस मला अटक कशी करु शकतात?



। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

वेगवेगळ्या पोलीस स्थानाकांमधील तक्रारींच्या आधारे दाखल करुन घेण्यात आलेल्या सर्व एफआयआर बेकायदा असून माझी अटकही बेकायदा आहे, असा दावा अभिनेत्री केतकी चितळेनं केलाय. आपल्याला अटक करताना व्यक्तीस्वातंत्र्याच्या कायद्याचा भंग करण्यात आला असल्याने आपल्याला नुकसानभरपाई देण्यात यावी अशी मागणीही केतकी चितळेनं न्यायालयाकडे याचिकेद्वारे केली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्याविरोधात वादग्रस्त पोस्ट केल्याप्रकरणी कळवा पोलीस स्थानकाबरोबरच महाराष्ट्रातील वेगवेगळ्या पोलीस स्थानाकांमध्ये केतकीविरुद्ध एफआयआर दाखल करण्यात आल्या आहेत. १५ मे पासून म्हणजेच मागील २३ दिवसांहून अधिक काळापासून केतकी अटकेत आहे. याच प्रकरणी तीने आता थेट मुंबई उच्च न्यायालयामध्ये धाव घेतली आहे. केतकी प्रकरणी तातडीने सुनावणी घेण्यात यावी यासाठी आज म्हणजेच मंगळवारी सात जूनरोजी अर्जाद्वारे विनंती करण्यात येणार असल्याचं तिचे वकील घनश्याम उपाध्याय यांनी सांगितलंय.

## औरंगाबाद शहरातील सर्व रस्ते होणार चकाचक

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

औरंगाबाद शहरातील रस्त्यांच्या कामांसाठी महापालिकेच्यावतीने आज २०७ कोटी रुपये मंजूर करण्यात आले. या निधीतून शहरातील २२४ रस्ते चकाचक होतील, असा विश्वास पालकमंत्री तथा उद्योगमंत्री सुभाष देसाई यांनी व्यक्त केला. स्मार्ट सिटी योजनेतंर्गत रस्त्यांसाठी शहरातील रस्त्यांसाठी यापूर्वी ३१७ कोटी मंजूर करण्यात आले आहेत. आता आणखी २२४ रस्ते केले जाणार असून त्यासाठी २०७ कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. एकूण ५२४ कोटी रुपये रस्त्यासाठी खर्च होत आहे. या निमित्ताने शहरातील नागरिकांना चकाचक रस्ते मिळतील. स्थानिक आमदार प्रदीप जैस्वाल, संजय शिरसाठी, आंबादास दानवे यांच्या सततच्या पाठपुराठ्यानंतर महापालिका आयुक्त अस्तिक कुमार पांडे यांनी हा निधी मंजूर केला.

## महाविकास आघाडीची बैठक संपल्यानंतर उद्धव ठाकरेंची पहिली प्रतिक्रिया, म्हणाले "काहीही..."

### बैठकीत 12 अपक्ष आमदारांसह काँग्रेसचे 32, शिवसेनेचे 45, राष्ट्रवादीचे 42 आमदार उपस्थित होते

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

या बैठकीनंतर महाविकास आघाडीमधील इतर नेत्यांनी आपल्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत. काँग्रेसचे आमदार अभिजीत वंजारी यांनी याबाबत बोलताना सांगितलं की, या बैठकीत वेगळं काही बोललं गेलं नाही. महाविकास आघाडीकडे पुरेसं संख्याबळ असल्यानं आपले चारही उमेदवार निवडून येणार असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. तसेच सत्तापिपासू लोकांना आपल्याला सत्तेपासून दूर ठेवायचं आहे. सर्व उमेदवार निवडून आणायचे आहेत. त्यासाठी आपलं ऐक्य दाखवा, असं मुख्यमंत्री बैठकीत म्हणाल्याची माहिती अभिजीत वंजारी यांनी दिली आहे.



▶▶| काँग्रेसचे आमदार अभिजीत वंजारी यांनी याबाबत बोलताना सांगितलं की, या बैठकीत वेगळं काही बोललं गेलं नाही. महाविकास आघाडीकडे पुरेसं संख्याबळ असल्यानं आपले चारही उमेदवार निवडून येणार असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

दरम्यान, या बैठकीत १२ अपक्ष आमदारांसह काँग्रेसचे ३२, शिवसेनेचे ४५, राष्ट्रवादीचे ४२ आमदार उपस्थित होते. त्यामुळे महाविकास आघाडीचं पारडं सगळ्यांनी महाविकास आघाडीच्या चारही उमेदवारांना निवडून आणा, ऐक्य दाखवा आणि मतदान करताना काळजी घ्या, असं शरद पवारांनी बैठकीत आमदारांना

## शॉर्ट न्यूज »

### गोव्यात ब्रिटीश महिला पर्यटकावर बलात्कार, एकास अटक

।नवी दिल्ली । महाईन्यूज ।प्रतिनिधी।

गोव्यातील आरंबोल समुद्रकिनाऱ्याजवळ एका महिला ब्रिटिश पर्यटकावर स्थानिकाने बलात्कार केल्याची धक्कादायक घटना सोमवारी (२ जून) घडली आहे. आरोपीने महिलेसोबत आलेल्या एका पुरुष पर्यटकासमोरच हा अत्याचार केल्याचे सांगितले जात आहे. दरम्यान, पोलिसांनी या घटनेची गंभीर दखल घेतली असून ३२ वर्षीय आरोपी व्हिन्सेंट डिसोझा याला अटक केले आहे. आरोपी डिसोझाने याआधी ग्रंथपाल म्हणून काम केलेले आहे. याबाबत एनडीटीव्हीने सविस्तर वृत्त दिले आहे. या वृत्तानुसार ब्रिटनमधील एक मध्यमवयीन महिला एका पुरुष साथिदारासोबत पर्यटनासाठी गोव्यामध्ये आली होती. सोमवारी (२ जून) ती आरंबोल समुद्रकिनाऱ्याजवळ आराम करत होती. यावेळी बॉडी मसाज देण्याच्या बहाण्याने आलेल्या आरोपी व्हिन्सेंट डिसोझाने या महिलेवर बलात्कार केला.

# “मोदींनी हे समजून घेण्याची गरज आहे की…”; भाजपाला लक्ष्य करत ओवेसींकडून नुपूर शर्मांच्या अटकेची मागणी

## प्रेषित अवमान प्रकरण / भिवंडीमध्ये झालेल्या स्वत:च्या सभेमधील भाषणाचा संदर्भ देत ओवेसींनी पंतप्रधान मोदींवर केली टीका

।नवी दिल्ली ।महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

१० दिवसांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी कारवाई करतात, असं म्हणत ओवेसींनी मोदींवर टीका केलीय (फाइल फोटो) Asaduddin Owaisi Says Arrest Nupur Sharma: पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि त्यांच्या पक्षाने देशातील २० कोटी अल्पसंख्यांक मुस्लिमांविरोधात जे द्वेषाचं वातावरण निर्माण केलं आहे त्यामुळेच त्यांच्या पक्षाचे प्रवक्ते अशाप्रकारची वायफळ बडबड करत असल्याचा टोला एमआयएमआयएमचे प्रमुख असदुद्दीन ओवेसी यांनी लगावलाय. नांदेडमध्ये प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना ओवेसी यांनी प्रेषित मोहम्मद यांच्याबद्दलच्या अवमानकारक वक्तव्य केल्याप्रकरणी भाजपाच्या प्रवक्त्या नुपूर शर्मा यांनी अटक करवी अशीही मागणी केलीय. ओवेसी यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना काही दिवसांपूर्वीच आपण भिवंडीच्या सभेमध्ये पक्ष प्रवक्त्यांवर कारवाई करावी अशी मागणी केल्याची आठवण करुन दिली. “भाजपाच्या प्रवक्त्यांनी एका वृत्तवाहिनीवर प्रेषित मोहम्मद यांचा अपमान केल्यानंतर १० दिवसांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी कारवाई करतात. भिवंडीमधील माझ्या भाषणात मी पंतप्रधानांना आवाहन केलं की, तुम्ही या देशाचे पंतप्रधान आहात. इथं २० कोटी मुस्लीम राहतात. ते भारताचे नागरिक आहेत. तुम्ही तुमच्या मुख्य प्रवक्त्यांविरोधात कारवाई करा. पण तुम्ही कारवाई केली नाही,” असं ओवेसी म्हणाले.



“१० दिवसांनी तुम्ही कारवाई केली. का केली तर देशाचे उपराष्ट्रपती विमानात आहेत ते कतारमध्ये लॅण्ड करणार आहेत. तेव्हा कतारने उपराष्ट्रतींचा कार्यक्रम रद्द करण्याचा इशारा दिला. तेथील सरकारने भारतीय राजदूतांना बोलवून तुमच्या देशातील भाजपाच्या प्रवक्त्यांनी प्रेषित मोहम्मद यांच्याबद्दल अवमानकारक वक्तव्य केल्याचं सांगितलं. यापेक्षा मोठा अपमान नाहीय भारताचा,” असा टोला ओवेसींनी भाजपावर निशाणा साधताना लगावला. आपले उपराष्ट्राध्यक्ष एका देशाच्या दौऱ्यावर आहेत आणि त्याच देशामध्ये तेथील सरकार आपल्या राजदूतांना बोलावून इशारा देते, हे खेदजनक आहे, असंही ओवेसी म्हणाले.पुढे बोलताना ओवेसी यांनी नुपूर शर्माच्या अटकेची मागणी केली. **करावा लागेल आणि याचा थेट परिणाम आर्थिक वाढीच्या दरावर होईल.**

“१० दिवसांनी तुम्ही कारवाई केली. का केली तर देशाचे उपराष्ट्रपती विमानात आहेत ते कतारमध्ये लॅण्ड करणार आहेत. तेव्हा कतारने उपराष्ट्रतींचा कार्यक्रम रद्द करण्याचा इशारा दिला. तेथील सरकारने भारतीय राजदूतांना बोलवून तुमच्या देशातील भाजपाच्या प्रवक्त्यांनी प्रेषित मोहम्मद यांच्याबद्दल अवमानकारक वक्तव्य केल्याचं सांगितलं. यापेक्षा मोठा अपमान नाहीय भारताचा,” असा टोला ओवेसींनी भाजपावर लगावला. आपले उपराष्ट्राध्यक्ष एका देशाच्या दौऱ्यावर आहेत आणि त्याच देशामध्ये तेथील सरकार आपल्या राजदूतांना बोलावून इशारा देते, हे खेदजनक आहे, असंही ओवेसी म्हणाले.

# केंद्र सरकारकडून सीडीएस नियुक्ती नियमांत मोठे बदल; ‘या’ अधिकाऱ्यांना मिळणार संधी

## केंद्र सरकारने चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ (CDS) या पदावरील नियुक्तीच्या नियमांमध्ये मोठा बदल

।नवी दिल्ली ।महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

केंद्र सरकारने चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ (CDS) या पदावरील नियुक्तीच्या नियमांमध्ये मोठा बदल केला आहे. सीडीएस पदासाठी पात्र अधिकाऱ्यांची व्याप्ती वाढवत, संरक्षण मंत्रालयाने मंगळवारी नवीन मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. त्यानुसार आता नौदल आणि हवाई दलात सेवा करणारे लेफ्टनंट जनरल किंवा त्यांच्या समकक्ष पदावरील अधिकारी देखील सीडीएस पदासाठी पात्र ठरणार आहेत. संरक्षण मंत्रालयाने वायू दल कायदा १९५० च्या कलम १९० मधील एअरफोर्स रेग्युलेशन १९६४ मध्ये देखील सुधारणा केली आहे.



पात्रतेच्या निकषांमध्ये आणखी एक महत्त्वाचा बदल म्हणजे नुकतेच निवृत्त झालेले लष्करप्रमुख आणि उपप्रमुखही या पदासाठी पात्र असणार आहेत. असं असलं तरी त्यांच्यासाठी ६२ वर्षे ही वयोमर्यादा घालण्यात आली आहे. देशाचे पहिले चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ जनरल बिपिन रावत यांचं गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये तामिळनाडूमध्ये हेलिकॉप्टर अपघातात निधन झालं. त्यानंतर हे बदल करण्यात आले आहेत. रावत यांचं निधन झाल्यापासून सीडीएस पद रिक्त होतं. चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ हे भारतीय लष्करातील सर्वात मोठ्या पदांपैकी एक पद आहे. हे पद भारत सरकार आणि तिन्ही संरक्षण दलांच्या कामकाजात अधिक समन्वय राखण्यासाठी तयार करण्यात आलं होतं. आधुनिकीकरण प्रकल्प, पदोन्नती इत्यादींना मान्यता देण्यासाठी देशातील संरक्षण दल पूर्वी नोकरशाहीतून जात असे, परंतु लष्करी व्यवहार विभाग स्थापन झाल्यापासून ही सर्व कामे लष्कराच्या अखत्यारीत आली.

चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ हे भारतीय लष्करातील सर्वात मोठ्या पदांपैकी एक पद आहे. हे पद भारत सरकार आणि तिन्ही संरक्षण दलांच्या कामकाजात अधिक समन्वय राखण्यासाठी तयार करण्यात आलं होतं. आधुनिकीकरण प्रकल्प, पदोन्नती इत्यादींना मान्यता देण्यासाठी देशातील संरक्षण दल पूर्वी नोकरशाहीतून जात असे, परंतु लष्करी व्यवहार विभाग स्थापन झाल्यापासून ही सर्व कामे लष्कराच्या अखत्यारीत आली.

याशिवाय तिन्ही सैन्य दलाचे प्रमुख उद्या दुपारी नॅशनल मीडिया सेंटरमध्ये संयुक्त पत्रकार परिषद घेणार आहेत. ही पत्रकार परिषद सरकारच्या महत्त्वाच्या धोरणाबाबत असणार आहे. तिन्ही लष्करप्रमुख ‘टूर ऑफ ड्यूटी’बाबत घोषणा करणार आहेत. त्यानुसार ४० ते ५० हजार सैनिकांची भरती करण्यात येणार आहे. त्यांची नोकरी साडेतीन ते चार वर्षांची असणार आहे.


# पंजाबमध्ये आता राहुल गांधींच्या सुरक्षेत कुचराई?

।नवी दिल्ली ।महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

पंजाब विधानसभा निवडणुकांपूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भेटीवेळी सुरक्षेत कुचराई झाल्याचा मुद्दा बराच चर्चेत राहिला होता. मोदींचा ताफा एका उड्डाणपुलावर तब्बल २० मिनिटं खोळंबून राहिला होता. शेतकऱ्यांच्या आंदोलनामुळे ताफा अडकून पडल्याचं स्पष्ट झालं होतं. मात्र, यामुळे मोदींना तिथून माघारी फिरावं लागलं होतं. या पार्श्वभूमीवर सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये बरेच आरोप-प्रत्यारोप झाले होते. आता काँग्रेस खासदार आणि माजी अध्यक्ष राहुल गांधी यांच्या सुरक्षेमध्ये कुचराई झाल्याचा प्रकार समोर आला आहे. दिवंगत गायक सिद्धू मूसेवाला यांच्या घरी राहुल गांधी भेट देण्यासाठी गेले असता त्यांचा ताफा तब्बल २० मिनिटांपर्यंत भलत्याच दिशेने जात

# रणधुरंधर नरवीर मुरारबाजी देशपांडे यांची यशोगाथा आता मोठ्या पडद्यावर

गेल्या काही दिवसांपासून ऐतिहासिक चित्रपटांची रिघ लागली आहे. मराठी सिनेविश्वात ऐतिहासिक चित्रपटांना प्रेक्षकांनी भरभरून प्रतिसाद दिल्यानंतर आता 'वीर मुरारबाजी...पुरंदरची युद्धगाथा' या ऐतिहासिक चित्रपटाची घोषणा करण्यात आली आहे. स्वराज्याच्या इतिहासात पुरंदरचे 'काळभैरव' म्हणून ओळख असणारे मुरारबाजी देशपांडे यांची यशोगाथा मराठी रुपेरी पडदयावर पुढच्या वर्षी १७ फेब्रुवारी २०२३ ला येण्यासाठी सज्ज होत आहे. शिवराज्याभिषेक दिनाचे औचित्य साधून या चित्रपटाची पहिली झलक प्रदर्शित करण्यात आली आहे.




अठरापगड जाती-जमातीच्या शूर मावळ्यांना सोबत घेत शिवरायांनी जाज्वल्य इतिहास घडविला. सह्याद्रीच्या दऱ्या-खोऱ्यात लढाया करणारे शूरवीर आणि पराक्रमी मावळे स्वराज्यासाठी जीवाची बाजी लावण्यासाठी सदैव तयार असत. अशा पराक्रमी आणि निष्ठावंत मावळ्यांमध्ये रणधुरंधर नरवीर मुरारबाजी देशपांडे हे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागते. 'फत्तेशिकस्त' आणि 'पावनखिंड' चित्रपटाच्या घवघवीत यशानंतर आलमंड्स क्रिएशन्स व ए.ए.फिल्म्स यांनी 'वीर मुरारबाजी... पुरंदरची युद्धगाथा' चित्रपटाची घोषणा केली आहे. या चित्रपटाची निर्मिती अजय आरेकर, अनिरूद्ध आरेकर, भाऊसाहेब आरेकर यांची आहे.

# स्पृहा जोशी येणार प्रेक्षकांच्या भेटीला; मीडियम स्पाइसीमध्ये वैशिष्ट्यपूर्ण भूमिका

अभिनयाबरोबरच लेखन, सूत्रसंचालन, कवितांमध्ये व्यस्त असलेली स्पृहा जोशी आता नव्या चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. मीडिअम स्पाइसी या चित्रपटात तिची वैशिष्ट्यपूर्ण भूमिका असून या चित्रपटाचा ट्रेलर नुकताच प्रदर्शित झाला होता. आशयघन चित्रपटातून आपल्या अभिनयाची छाप उमटवणारी नव्या पिढीतील एक हरहुन्नरी कलाकार म्हणजे स्पृहा जोशी. चित्रपट, रंगभूमी आणि टेलिव्हिजनवर लीलया वावरणारी आणि अभिनयाबरोबरच लेखन, सूत्रसंचालन, कविता या माध्यमातून रसिकांचे मनोरंजन करणारी स्पृहा "मीडियम स्पाइसी"मध्ये कृष्णा नावाच्या एका छोट्याशा पण वैशिष्ट्यपूर्ण भूमिकेत दिसणार आहे. कृष्णा नक्की कोण आहे? याचा अजून खुलासा झालेला नसला तरी जेवणाच्या थाळीत विविध फ्लेवर्स असल्यावर जसे जेवण परिपूर्ण होते तसेच स्पृहा जोशीच्या कृष्णा या पात्राच्या फ्लेवरमुळे "मीडियम स्पाइसी" चित्रपटातील पात्रांच्या विविध फ्लेवर्सने सजलेली लज्जतदार थाळी परिपूर्ण होणार आहे. लॅन्डमार्क फिल्म्स प्रस्तुत, विधि कासलीवाल निर्मित, इरावती कर्णिक लिखित आणि मोहित टाकळकर दिग्दर्शित आणि ललित प्रभाकर, सई ताम्हणकर, पर्ण पेठे, सागर देशमुख, नेहा जोशी, पुष्कराज चिरपुटकर, इप्शिता या तरुण कलाकारांसह ज्येष्ठ अभिनेत्री नीना कुळकर्णी, अरुंधती नाग आणि अभिनेते रवींद्र मंकणी यांच्या सहज सुंदर अभिनयाने सजलेला "मीडियम स्पाइसी" ची लज्जतदार डिश १७ जूनपासून संपूर्ण महाराष्ट्रात रसिक प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे.



# "मी सलमान खानला कधीच घेतल नसतं कारण...",

## 'मुळशी पॅटर्न'च्या हिंदी रिमेकवर प्रवीण तरडेंच वक्तव्य चर्चेत

लेखक, दिग्दर्शक आणि अभिनेते प्रवीण विठ्ठल तरडे यांचा 'मुळशी पॅटर्न' हा चित्रपट आजही चर्चेचा विषय ठरतो. या चित्रपटाने प्रेक्षकांना वेड लावलं होतं. याच चित्रपटाच्या हिंदी रिमेकमध्ये बॉलिवूडचा भाईजान सलमान खान दिसला आहे. पण सलमानच्या कास्टिंगवर प्रविण यांनी नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत एक वक्तव्य केले आहे.

प्रवीण नुकत्याच दिलेल्या मुलाखतीत कास्टिंग विषयी बोलत होते. "मुळशी पॅटर्न हा शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर आधारित बनवलेला चित्रपट आहे. 'मुळशी पॅटर्न'च्या माध्यमातून मला शेतकऱ्यांचे प्रश्न राष्ट्रीय स्तरावर मांडण्याची संधी



आली होती.

# "ऐकून छान वाटतंय तुम्हाला...",

## तेजस्विनी पंडितची 'रानबाजार' सीरिजबद्दलची पोस्ट चर्चेत




अभिनेत्री तेजस्विनी पंडित ही लोकप्रिय अभिनेत्रींपैकी एक आहे. तेजस्विनी सध्या तिच्या रानबाजार या वेब सीरिजमुळे चर्चेत आहे. तेजस्विनी सोशल मीडियावर सक्रिय असल्याचे दिसते. सोशल मीडियावर फोटो आणि व्हिडीओ शेअर करत ती चाहत्यांच्या संपर्कात राहते. तेजस्विनीने नुकतीच 'रानबाजार' या तिच्या वेब सीरिजला प्रेक्षकांकडून मिळणाऱ्या प्रेम आणि प्रतिसादाबद्दल एक पोस्ट शेअर केली आहे. सध्या ही पोस्ट सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाली आहे.

"...त्यादिवशीही मला शूटींगला आल्यासारखं वाटत होतं", विराजसने सांगितला लग्नादरम्यानचा 'तो' किस्सातेजस्विनीने ही पोस्ट तिच्या इन्स्टाग्राम अकाउंटवरून शेअर केली आहे. या पोस्टमध्ये तेजस्विनीने 'रानबाजार' सीरिजमधील तिची भूमिका आयेशाचा फोटो शेअर केला आहे. हा फोटो शेअर करत "ऐकून छान वाटतंय !

# धर्मेंद्र यांच्याकडे जेवणासाठी पैसे नव्हते म्हणून पोट भरण्यासाठी खाल्ला ईसबगोल

नेहमीप्रमाणे धर्मेंद्र काम मागण्यासाठी निर्मात्यांच्या कार्यालयात वणवण फिरले. अखेर थकून ते घरी आले. हातात काम नव्हते आणि खिशात पैसे नव्हते. उंचपुरा धिप्पाड देह आणि देखणं व्यक्तीमत्व लाभलेले धर्मेंद्र मूळचे पंजाबचे. शेतकरी कुटुंबात जन्माला आलेल्या धर्मेंद्र यांना लहानपणापासूनच सिनेमात काम करण्याची इच्छा होती. पण कुटुंब शेतकरी असल्याने धर्मेंद्र यांनीही शेती करावी अशी त्यांच्या आईवडिलांची इच्छा होती. पण धर्मेंद्र यांनी आपल्याला सिनेमात काम करायचंय असं घरातल्यांना ठणकावून सांगितलं त्यामुळे शेवटी त्यांच्या जिद्दी स्वभावापुढे आई वडीलही झुकले आणि त्यांनी धर्मेंद्र यांना स्वतचे नशीब आजमावण्याची संधी शोधण्याचे आव्हान केले. त्यानंतर धर्मेंद्र यांनीही क्षणाचाही विलंब न करता थेट मुंबई गाठली. १९५५-५६ साली ते मुंबई नगरीत आले. सिनेमाता काम मिळवण्यासाठी त्यांना अनेक प्रोड्युसरच्या ऑफिसच्या पायऱ्या झिजवल्या. पण त्यांना कोणीही काम दिले नाही. पण धर्मेंद्र स्वभावाने हट्टी होते महत्वाकांक्षी होते. ते अनेक ठिकाणी जाऊन ऑडिशन देत होते. सुखवस्तू घरातील असूनही मुंबईला आल्यावर त्यांनी कधीही वडिलांकडून खर्चासाठी पैसे मागितले नाहीत. पंजाबच्या मातीत खाड्याच्या मातीत वाढलेले धर्मेंद्र नियमित व्यायाम करत पण त्यामुळे त्यांना प्रचंड भूक लागायची. पण हातात काम नसल्याने त्यांच्याकडे पैसे ही नसत. एक मित्राबरोबर ते भाड्याच्या घरात राहात होते. दिवसभर फिरुनही त्यांना काम मिळत नव्हते. अखेर एक दिवशी अशीच सगळीकडे काम मागण्यासाठी फिरून झाल्यावर ते घरी आले. हातात काम नव्हते आणि खिशात पैसे नव्हते. यामुळे ते उपाशीपोटी झोपले. पण पोटात अन्नाचा कण नव्हता. भुकेचा डोंब उसळली होता. व्यायामच कसरती शरीर असलेल्या धर्मेंद्रला भूक असह्य झाली. शेवटी रुमपार्टनर असलेल्या मित्राच्या कपाटात त्यांना ईसबगोलचे पाकीट सापडले. त्यांनी मागचापुढचा विचार न करता पोट भरण्यासाठी पाकिटातले ईसबगोल घेतले.

त्यानंतर जे अपेक्षित होते तेच झाले. त्यांना पोटात मुरड मारून वेदना होऊ लागल्या. शेवटी रुमपार्टनर त्यांना डॉक्टरकडे घेऊन गेला. डॉक्टरांनी त्यांना काय खाल्लस असं विचारले त्यावर पोट भरण्यासाठी ईसबगोल घेतल्याचे त्यांनी सांगितले.



ज्येष्ठ अभिनेते बॉलीवूडचे हिमॅन धर्मेंद्र यांची तब्येत बिघडली असून त्यांच्यावर ब्रीच कँडी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या अफवेने सर्वत्र खळबळ उडालेली असतानाच पापा ठणठणीत असल्याचे धर्मेंद्र यांचे पुत्र बॉबी देऑल यांनी सांगितले आहे. यामुळे धर्मेंद्र यांचे चाहते निश्चिंत झाले असून त्यांच्या दिर्घायुष्यासाठी प्रार्थना करत आहेत. याचनिमित्ताने धर्मेंद्र यांच्या आयुष्यप्रवासाचे किस्सेही चर्चेत आले आहेत.

## शॉर्ट न्यूज »

### न्यूझीलंडचा 'हा' खेळाडू दुखापतीमुळे कसोटी मालिकेतून बाहेर



**। नवी दिल्ली । महाईन्यूज**

इंग्लंड आणि न्यूझीलंड LAND) यांच्यात कसोटी मालिका सुरू आहे. या मालिकेतील पहिला कसोटी सामना इग्लंडने जिंकला. त्यामुळे जागतिक कसोटी चॅम्पियनशिपमध्ये इंग्लंड आणि न्यूझीलंड यांच्यात कसोटी मालिका सुरू आहे. या मालिकेतील पहिला कसोटी सामना इग्लंडने जिंकला. त्यामुळे जागतिक कसोटी चॅम्पियनशिपमध्ये इंग्लंडच्या गुणांमध्ये वाढ झाली आहे. मात्र या पराभवामुळे कसोटी स्पर्धेतील न्यूझीलंडचे संकट आणखी वाढले आहे. त्यातच न्यूझीलंडचा अष्टपैलू कॉलिन डी ग्रँडहोम याला दुखापत झाली आहे. या दुखापतीमुळे त्याला इंग्लंडसोबत सुरू असलेल्या कसोटी मालिकेतील उर्वरित सामन्यांमधून बाहेर पडावे लागले.

### डायमंड लीग ॲथलेटिक्स स्पर्धा

# अविनाश साबळे पाचवा ; राष्ट्रीय विक्रम आठव्यांदा मोडला

### ऑलिम्पिक कांस्यपदक विजेत्या केनियाच्या बेंजामिन किगेनपेक्षा (8:17.32 से.) अविनाश सरस ठरला

**। मोरोक्को । महाईन्यूज ।**

भारताच्या अविनाश साबळेने प्रतिष्ठेच्या डायमंड लीग ॲथलेटिक्स स्पर्धेतील ३००० मीटर स्टीपलचेस प्रकारात पाचवा क्रमांक मिळवला. तसेच स्वत:चाच राष्ट्रीय विक्रम आठव्यांदा मोडण्याची किमया साधली. सेनादलात कार्यरत असलेल्या महाराष्ट्राच्या बीड जिल्ह्यातील २७ वर्षीय अविनाशने ८:१२.४८ सेकंद अशी वेळ रविवारी नोंदवली. मार्च महिन्यात तिरुवनंतपूरम येथे झालेल्या इंडियन ग्रां. प्रि. ॲथलेटिक्स स्पर्धेत अविनशाने ८:१६.२१ से. वेळेसह राष्ट्रीय विक्रम नोंदवला होता, तो या वेळी मोडीत काढला. टोक्यो ऑलिम्पिक सुवर्णपदक विजेत्या मोरोक्कोच्या सौफीयानी एल बक्कालीने ७:५८.२८ से. वेळेसह ही शर्यत जिंकली. ऑलिम्पिक रौप्यपदक विजेत्या ईथिओपियाच्या लॅमेअरे




गिरमाने ७:५९.२४ से. वेळनिशी दुसरा क्रमांक मिळवला, तर हेलीमारियम टेगेनला (८:०६.२९ से.) तिसरा क्रमांक मिळाला. रिओ ऑलिम्पिक विजेत्या केनियाच्या कॉन्सेसलस किप्रुटोला (८:१२.४७ से.) चौथ्या क्रमांकावर समाधान मानावे लागले. त्याने अविनाशपेक्षा एक शतांश सेकंद उत्तम वेळ नोंदवली. ऑलिम्पिक कांस्यपदक विजेत्या केनियाच्या बेंजामिन किगेनपेक्षा (८:१७.३२ से.) अविनाश सरस ठरला.

तिरुवनंतपूरम येथे झालेल्या इंडियन ग्रां. प्रि. ॲथलेटिक्स स्पर्धेत अविनशाने ८:१६.२१ से. वेळेसह राष्ट्रीय विक्रम नोंदवला होता, तो या वेळी मोडीत काढला. टोक्यो ऑलिम्पिक सुवर्णपदक विजेत्या मोरोक्कोच्या सौफीयानी एल बक्कालीने ७:५८.२८ से. वेळेसह ही शर्यत जिंकली. ऑलिम्पिक रौप्यपदक विजेत्या ईथिओपियाच्या लॅमेअरे गिरमाने ७:५९.२४ से. वेळनिशी दुसरा क्रमांक मिळवला, तर हेलीमारियम टेगेनला (८:०६.२९ से.) तिसरा क्रमांक मिळाला. रिओ ऑलिम्पिक विजेत्या केनियाच्या कॉन्सेसलस किप्रुटोला (८:१२.४७ से.) चौथ्या क्रमांकावर समाधान मानावे लागले. त्याने अविनाशपेक्षा एक शतांश सेकंद उत्तम वेळ नोंदवली.

# खेलो इंडिया क्रीडा स्पर्धा : पूजा, विवानला सुवर्ण

### महाराष्ट्राने 2 सुवर्ण, 6 रौप्य व 5 कांस्य अशी पदके पटकावली

**। पंचकुला । महाईन्यूज ।**



महाराष्ट्राने खेलो इंडिया क्रीडा स्पर्धेच्या चौथ्या दिवशी सायकिलग आणि योगासनात सुवर्णपदके पटकावली. याचप्रमाणे वेटलिफ्टिंगमध्येही कांस्य पदक मिळवले. योगासनातील सुवर्णपदक रुपेश सांगेने पटकावले. कलात्मक प्रकारात जय कालेकर, प्रीत बोरकर, रूपेश सांगे, सुमित बंडाळे, ओम राजभरने रौप्यपदक जिंकले. मुलींमध्ये या प्रकारात मृणाल बानाईत, रूद्राक्षी भावे, स्वरा गुजर, तन्वी रेडीज, गीता शिंदे यांनीही रौप्यपदक जिंकले. वेटलिफ्टिंगमध्ये राणी रानमाळेने ५५ किलो वजनी गटात १५९ किलो वजन उचलून कांस्यपदक प्राप्त केले. बॅडिमटनमध्ये महाराष्ट्राच्या दर्शन पुजारीने अंतिम फेरीत धडक मारली.

⏭ महाराष्ट्राने २ सुवर्ण, ६ रौप्य व ५ कांस्य अशी पदके पटकावली. ट्रॅक सायकिलगमध्ये परसूट प्रकारात मुलींमध्ये पूजा दानोळेने (कोल्हापूर) सुवर्णपदक जिंकले. याच प्रकारात मुलांमध्ये विवान सप्रूने (मुंबई) कांस्य मिळवले. स्प्रिंटमध्ये संज्ञा कोकाटेने रौप्यपदक जिंकले.

⏭ योगासनातील सुवर्णपदक रुपेश सांगेने पटकावले. कलात्मक प्रकारात जय कालेकर, प्रीत बोरकर, रूपेश सांगे, सुमित बंडाळे, ओम राजभरने रौप्यपदक जिंकले. मुलींमध्ये या प्रकारात मृणाल बानाईत, रूद्राक्षी भावे, स्वरा गुजर, तन्वी रेडीज, गीता शिंदे यांनीही रौप्यपदक जिंकले.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
708 309 8763

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही